पुढारी

# खुब्याच्या रुग्णांवर नैसर्गिक अस्थिपेशीचे प्रत्यारोपण



- देशातील पहिलीच थेरपी असल्याचा डॉक्टरांचा दावा
- कोरोनामुळे बळावला अस्थिपेशी कमी होण्याचा आजार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

खुब्यातील पेशी (सेल्स) कमी झाल्याने रुग्णाला अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस (एव्हीएन) चे निदान झाले. त्या ठिकाणी प्रत्यारोपण न करता रुग्णाच्या खुब्यातील नैसर्गिक अस्थिपेशी (बोन सेल) प्रयोगशाळेत कृत्रिमरीत्या वाढविण्यात आल्या. व त्या पेशी रुग्णाच्या खुब्यात प्रत्यारोपित करण्यात आल्या

या थेरपी मुळे रुग्णांचे दुखणे दूर झाले असून, त्यांचे अवयव पूर्ववत करण्यास डॉक्टरांना यश मिळाले आहे. देशात प्रथमच ही थेरपी वापरल्याचा दावा डॉक्टरांकडून करण्यात आला आहे.

कोरोनापश्चात तरुण रुग्णांमध्ये सांधेदुखी वाढली आहे. यामध्ये खुब्याचे, खांद्यांचे सांधे अधिक खराब झाल्याचे आढळून आले आहे. अशाच प्रकारच्या २०० रुग्णांवर पुण्यातील वरिष्ठ सांधे प्रत्यारोपण शल्यविशारद डॉ. आशिष अरबाट यांनी उपचार केले. ऑसग्रो पद्धत वापरून बोनसेल थेरपीने हे यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. त्यापैकी १४० रुग्णांना कोरोनापश्चात हा आजार झाल्याचे निदान झाले आहे, अशी माहिती डॉ. अरबाट यांनी दिली.

'एव्हीएन'ची मुख्य कारणे ही व्यसन, चुकीची औषध पद्धती तसेच हाडांची झीज झाल्यामुळे आहेत. ही थेरपी अस्थिप्रत्यारोपण शस्त्रक्रियेच्या तुलनेने स्वस्त आणि वेदनारहित आहे. या अस्थिपेशी उपचारपद्धती तंत्राचा वापर करून एव्हीएनच्या रुग्णांवर उपचार केलेल्या रिग्रो बायोसायन्सेसच्या नेटवर्कमधील अस्थिविकारतज्ज्ञांनी सांगितले.